ISBN NO. - 978-93-85162-31-2

Third UGC Sponsored

TWO DAYS INTERDISCIPLINARY / INTERNATIONAL CONFERENCE

On

# "GANDHISM : Past, Present and Future"

On

03rd & 04th February 2017



GANDHI STUDY CENTER

LEARN FROM THE LEGEND

NEW ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, WARDHA - 442001

Organized by

GANDHI STUDY CENTRE

New Arts, Commerce & Science College,

Wardha, Maharashtra (India) – 442001

ISBN NO. : - 978-93-85162-31-2
**Published and Chief Editor**
**Dr. Prashant R. Kadwe**
Director (Gandhi Study Center)
New Arts, Commerce and Science College, Wardha
**Printed By**
Jyotichandra Publication, Latur. At. Post – Latur, Dist. – Latur
Pin Code – 413531 (Maharashtra; India) Reg. No. : - II/17386/Ltr/ (45)

**Advisory Board**

Dr. R.G. Bhoyar
Dr. P.R. Bhoyar
Nicolus Boin (France)
Dr. Shashi Poonam (HP)
Dr. Sanjay Dhanvate
Dr. Surendra Ghogale
Dr. Rajiv Jadhav
Piterson (London)
Dr. Banarjee (Kolkata)
Dr. Swami (Mysure)
Authoṛ Macula(Washington S.S.)
Prof. V. K. Pande
Dr. Ravi Kumar (Dehli)
Dr. Rafida Nawaz (Multan; Pakistan)
Jesica (USA)
Dr. Prakash Shende
Dr. Virendrasingh Bais
Dr. SubhashLaohe
Dr. Sasagiri (Thailand)
Dr. Karabi Mitra (Kolkata)
Zangwein Leo (China)
Ivon Bola (Prg, Zekoslovakia)

**Board of Editors (Seminar Edition)**

Dr. Prakash Masram (Mumbai)
Dr. Arun Atkare
Dr. Maya Wankhede
Prof. Prafulla Bohrupi
Prof. Dhanshri Parkhi
Prof. Vaibhavi Ughade
Dr. Khurana
Dr. Jyoti Khadase
Prof. Kanchan Ingole
Dr. Neelakka C Patil (Karnataka)
Dr. Saddi (Ludhiyana)
Prof. Chandu Pakhare
Prof. Pramode Achegave
Prof. Sabiya Pathan
Prof. Sandip Pethare
Dr. Balraj Singh(Punjab)
Miss. Veena Atkare
DR. Megha Sabane

**Date of Publication**
**3rd February 2017**

*Note: The Board of Editors may or may not be agree with the thoughts mentioned by individual writer in the Book. The concerning writer will be responsible in case of authenticity of his paper*

| | | | |
|---|---|---|---|
| 87 | ज्योति सावले   राजेश लेहकपुरे | महात्मा गांधी के मूल्य और स्व-नियंत्रण | 306 |
| 88 | डॉ. सुधा व्यास | गांधीजी के धर्म प्रती विचार | 310 |
| 89 | मोहम्मद वसीम अकरम मोमिन | गांधी जी के विचारों की व्यवहारिकता वर्तमान परिपेक्ष्य मे | 316 |
| 90 | Dr. Vinayak B. Shinde | ग्रामीण विकास योजना एवं महात्मा गांधीजी का विकासवादी दृष्टीकोन | 319 |
| 91 | डॉ. अमर बोदरे | विद्यार्थी जीवनात गांधीवादाची प्रासंगिकता | 324 |
| 92 | प्रा.डॉ. बी.आर. कत्तुरवार | गांधी विचार : नैतिक, मानसीक व बौध्दीक आरोग्याचा दिपस्तंभ | 327 |
| 93 | डॉ. दीपक पा. लोणकर | गांधी–विनोबा के स्त्री विषयक विचार | 329 |
| 94 | डॉ. प्रगती दिनेश नरखेडकर | नक्षलवाद समस्या व उपाय | 331 |
| 95 | डॉ. प्रल्हाद एस. धोटे, डॉ. लोकेश बी. नंदेश्वर | महात्मा गांधीचे सत्याग्रहासंबंधीचे विचार व सत्याग्रह | 334 |
| 96 | प्रा. हितेश मा. टडमल | महात्मा गांधीचा सर्वोदय आणि ग्रामस्वराज्य दृष्टीकोन | 337 |
| 97 | प्रा.डॉ. शिंदे आर.डी. | म.गांधी प्रणीत आर्थिक विकासाचे प्रारूप | 340 |
| 98 | प्रा.मल्दोडे साहेबराव रामराव | महात्मा गांधी प्रणीत अहिंसा : एक जीवनप्रवाह | 344 |
| 99 | प्रा. देबडे संजय मारोतराव | म. गांधीजी यांचे शिक्षण विषयक विचार | 346 |
| 100 | प्रा. सुरेश जे. भालेराव | महात्मा गांधीचे सत्याग्रहासबंधी विचार | 349 |
| 101 | प्रा. सुरेश पवार | ग्रामीण पूनर्रचनेच्या दृष्टीकोनातून महात्मा गांधीचे विचार | 351 |

बराक ओबामाचा राजकीय क्षितीजावर उदय झाला तव्हा काळया वर्णाचे ओबामा गांधी विचारामुळेच अमेरिकेचे अध्यक्ष झ ाले. माणूस तेवढा एक आहे, हे गांधीजींचे तत्व. गांधीजी हे नव्या जगाचे रोल मॉडेल असल्याचे बराक ओबामांनी जाहीर केले होते. मावळलेल्या सहस्त्रकातला महामानव गांधीजी असल्याचे मत बहुसंख्येने नोंदवले होते. म्हणूनच जगानं आपला मानलेला गांधीविचार हा आजही भारताच्या प्रगतीचा मार्ग दाखवतो.

संदर्भ सूची
१ साप्ताहिक साधना, १६ ऑक्टोबर २००७.
२ र.घ.वराडकर, भारतीय राजकीय विचारवंत, पुनर्मुद्रण २००५, विद्या प्रकाशन, नागपूर.
३ International Multi Disciplinary Research Journal, SHODHANKAN, 7 Oct. 2013.
४ लोकराज्य, महात्मा : माणुसकीची मशाल, ऑक्टोबर, २०१०.
५ प्राचार्य डॉ.पी.डी.देवरे, डॉ.डी.एस.निकुंभ, भारतीय राजकीय विचार, प्रथमावृत्ती, २००८, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
६ संपादक स.मा.गर्गे, भारतीय समाजविज्ञान कोश, पहिली आवृत्ती खंड-२, कल्पना मुद्रणालय, सदाशिव पेठ, पुणे

# म. गांधीजी यांचे शिक्षण विषयक विचार

*प्रा. देबडे संजय मारोतराव*
*देगलूर महाविद्यालय देगलूर*

भारताच्या इतिहासातून म. गांधी यांचे विचार जर वगळले तर भारताचा इतिहास हा अपूर्ण व निर्जिव बनेल. म. गांधींनी भारताच्या इतिहासास विलक्षण आयाम प्रदान केले. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाला चारित्र्यआणि मानवता या मूल्यांचे विस्मयकारक स्वरुप प्रदान केले. त्यांनी या देशातील कणा मोडलेल्या आणि जगण्याचे भान हरवलेल्या लोकांना गदगदून उत्थान करण्याची व स्वातंत्र्याला गवसणी घालण्याची प्रेरणा दिली. म. गांधी यांनी आपल्या स्वतःच्या जीवनाकडे एक प्रयोग म्हणून पाहिले होते. त्यांनी आपले जीवन चरित्र अत्यंत प्रमाणिकपणे लिहिले असून त्यांनी आपल्या या आत्मकथेला सत्याचे प्रयोग संबोधले आहे. त्यांच्या या आत्मकथेला जागतिक साहित्यात महत्वाचे स्थान आहे. म. गांधी यांच्यावर त्यांची आई पुतळाबाई आणि वडील करमचंद यांच्या वर्तन आणि संस्काराचा मोठा प्रभाव दिसून येतो. त्यांची ईश्वरनिष्ठा, अध्यात्मवादी विचारसरणी आणि परधर्मसंहिष्णुता हा त्याचाच परिपाक होय. त्यांच्या जीवनविषयक तत्वज्ञानात मानवाविषयी प्रेम, अहिंसा, सत्य, ब्रम्ह्चर्य, असंग्रह, सर्वधर्मसमभाव, सेवाभाव, स्वदेशी ही सर्व एक वृत्त म्हणून आचरणात आणलेली मूल्य होत. मानव हा कोणत्याही देशात अथवा कोणत्याही वर्ण किंवा जातीत जन्मलेला असो त्याला मानवासारखीच वागणूक मिळालेली पाहिजे हे त्यांचे मूलतत्त्व होय. दीन, दलित, दुःखी, दरिद्री, शोषित, पीडित लोकांची सेवा करणे हाच खरा मानवधर्म आहे. असे त्यांचे मत होते. ''To Searve huminity is to searve God' या तत्वानुसार त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. म. गांधी यांच्या अशा विचारांचा राजकारण, समाजकारण, शिक्षण इत्यादीवर प्रभाव पडत गांधीवादी विचारसरणी विकसित होत गेली.

**म. गांधीजींचे शिक्षण विषयक विचार:-**म. गांधी यांचे शिक्षणासंबंधी विचार हे त्यांनी गुजराती, हिंदी आणि इंग्रजी भाषेत लिहिलेले अनेक लेख आणि विविध ठिकाणी केलेल्या भाषणातून व्यक्त झालेले आहेत.

**शिक्षणाचा अर्थ:-**

म. गांधींनी शिक्षणाचा अतिशय व्यापक अर्थ सांगितला आहे. त्यांच्या मते, केवळ साक्षरता म्हणते शिक्षण नव्हे. साक्षरता ही शिक्षणाची सुरुवात देखील नाही. साक्षरता हे शिक्षणाचे साधन आहे, ते साध्य नाही. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचे शरीर, मन, बुध्दी आणि आत्मा यात जे सर्वोत्कृष्ठ आहे, त्याचा विकास करणे होय. म. गांधीजी ३१ जुलै १९३७ च्या हरिजन पत्रिकेत लिहितात. "By education, I mean un all round drawing out the best in child and man body, mind and spirit. literacy is not the end of the education, nor even the begining, it is only one of the means whereby man and women can be educated. Literacy in itself is no education." याचा अर्थ शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमतांचा सर्वांगीन विकास करणे होय. म. गांधींना शिक्षणातून विद्यार्थ्यांचा केवळ बौध्दीक विकास नव्हे तर शारीरिक, भावनिक, नैतिक आणि क्रियात्मक विकास करणे अपेक्षित होते. ते म्हणतात, "True education is that which draws not and simulates the spiritual, intellectual and physical faculties of children." म. गांधीच्या मते, विद्यार्थ्यांचे डोके म्हणजे रिकामे खोके नव्हे कि जे हवं ते त्यात कोंबावं किंवा विद्यार्थी म्हणजे मातीचा गोळा नव्हे कि त्याला हवा तो आकार द्यावा. विद्यार्थी जेव्हा

जन्माला येतो तेव्हा काही समजप्रवृती घेवून येतो. त्यामुळे त्याच्या सहजप्रवृत्ती ओळखुन त्याचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे, जीवनातील उच्च मूल्ये संपादन करण्याचे साधन होय. म्हणून त्यांनी शिक्षणात साक्षरता किंवा शास्त्राच्या ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला अधिक महत्त्व दिलेले आहे. त्यामुळे त्यांनी बालकेंद्रीत व जीवनकेंद्रीत शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या हात, डोके व हृदयाचा विकास करणे होय. म. गाधी म्हणतात, शिक्षणाद्वारे सत्याचे व पवित्र अंत:करणाचे दर्शन घडवावे. त्यांच्या मते, "Your education is absolutely worthless if it is not built on a solid foundation of truth and purity." शिक्षणाद्वारे चांगले काय आणि वाईट काय याचे ज्ञान आम्हाला होऊ शकते. म्हणून जे शिक्षण आम्हाला असे ज्ञान प्राप्त करुन देऊ शकत नाही ते शिक्षण नसून आत्मप्रतारणाच होय. व्यक्तीला रोजगाराची संधी उपलब्ध करुन देऊ शकते, विविध स्वरुपाची व्यावसायिक क्षमता प्राप्त करुन देऊ शकते तेच खरे शिक्षण होय.

**शिक्षणाची उदिष्ट्ये:-**

म. गांधीनी शिक्षणाची उद्दिष्टं काय असावेत याबाबतही आपले मत व्यक्त केले आहेत. शिक्षणाची उद्दिष्टे व्यक्तिनिष्ठ असावीत की समाजनिष्ठ या प्रश्नाबाबत त्यांच्या मते ही दोन्ही उद्दिष्टं परस्परपुरक आहेत. व्यक्ती हिच शिक्षणाचा केंद्रबिंदू असली पाहिजे परंतु व्यक्तीने सुध्दा ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे तिचा विकास समाजामुळे होतो. व्यक्तीच्या जीवनाची सफलता सामाजिक सेवेतच असते. उपनिषदातील, सा विद्या सा विमुक्तं या श्लोकात शिक्षणाची उद्दिष्टे त्यांना मान्य होती. या श्लोकाचा खरा अर्थ सांगताना ते म्हणतात, विद्या म्हणजे केवळ अध्यात्मिक ज्ञान व मूक्ती म्हणजे सुटका एवढाच या मंत्राचा अर्थ आहे. या जीवनातील सर्व प्रकाराच्या गुलामगिरीतून सूटका करुन घेणे, गुलामगिरी म्हणजे दुसऱ्याच्या स्वाधीन असणे किंवा आपण निर्माण केलेल्या कृत्रिम गरजांचे गुलाम बनने यापासून ज्या योगे मूक्ती मिळते तेच खरे शिक्षण होय. तसेच शिक्षणाचा उद्देश केवळ माहिती कोंबून व्यक्तीला ज्ञान संपन्न करणे नव्हे ज्ञान संपन्नते बरोबरच चारित्र्यसंपन्नता ही व्यक्तीच्या जीवनाला अत्यावश्यक बाब असून शिक्षणाद्वारे हे साध्य करता आले पाहिजे. "The end of the all knowledge most be building up character" असे म. गाधींनी म्हटले आहे.

**शिक्षणाचे माध्यम आणि अध्ययनपध्दती:-**

म. गांधींनी शिक्षणाचे माध्यम कोणते असावेत? अध्ययन-अध्यापन कोणत्या पध्दतीने करावेत याबाबतही विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, संपूर्ण शिक्षण मातृभाषेतून द्यावे. ते इंग्रजीच्या माध्यमातून शिक्षण देण्याच्या विरोधात होते. इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे म्हणजे विद्यार्थ्यांचा नैसर्गिक विकास खुंटवणे व त्यांची नवनिर्माणक्षमता मारणे होय. म. गांधी यांनी सांगितलेली अध्ययनपध्दती त्यांच्या नई तालिम योजनेतून स्पष्ट होते. ती 'Learning by doing' या तत्वावर आधारलेली आहे. त्यांच्या मते हस्तव्यवसाय पध्दती (Craft Method) ही अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त असते. प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन केल्यास ते परिणामकारक ठरते. म्हणून त्यांनी आपल्या मुलोद्योगी शिक्षणाच्या योजनेत प्रात्यक्षिकांना (Project Method), हस्तव्यवसाय पध्दती (Craft Method), समन्वय पध्दती (Method of Synthesis) यावर आधारित विविध कार्यक्रमांना प्राधान्य दिले होते. त्यांच्या मते, या पध्दतीतून व्यक्तीचे सामर्थ्य पणास लागते व बुध्दीला योग्य दिशा मिळते.

**शिक्षणाची तत्वे:-**

म. गांधींनी तत्कालीन भारतीय शिक्षण व शिक्षण व्यवस्थेला नवीन दृष्टी प्राप्त करुन देताना शिक्षणविषयक तत्वे विशद केली आहेत.

१. देशातील सर्व स्त्री-पुरुष साक्षर करावे.
२. साक्षरता हेच सार सर्वस्व नव्हे, शिक्षणाने माणसांचे शील घडवले पाहिजे. शिक्षणाने व्यक्तीला स्वालंबन, आत्मनिर्भर, आत्मविश्वास व निर्भयता शिकवले पाहिजे.
३. हे कसे करावे याचा विचार, याचे प्रयोग शिक्षण तज्ञांनी करावेत व नव-नवीन मार्ग शोधावेत.
४. अशा वृत्तीने काम करणारा शिक्षकच शिक्षण व्यवस्थेचा कणा असू शकतो. विद्यार्थी घडवण्यासाठी शिक्षक घडवणे हे अधिक महत्वाचे आहे.
५. प्रत्येकाला चौदा वर्षांच्या वयापर्यंत शिक्षण मिळावयास हवे तो पर्यंत त्याची सातवी इयत्ता पूर्ण व्हावी.
६. मातृभाषेतून शिक्षण दिले जावे.
७. अध्यापणासाठी Play Method पध्दतीचा अवलंब करावा.

ISBN NO.: 978-93-85162-31-2

८. विज्ञान-तंत्रज्ञान याचे शिक्षण राष्ट्राच्या गरजेप्रमाणे राष्ट्राने दिल पाहिजे. या शिक्षणासाठी विद्यार्थी निवडताना अध्ययन क्षमता व सामाजिक न्याय या दोन्ही गोष्टी कडे लक्ष दिले पाहिजे.

९. उच्च शिक्षणाची संधी ही आपल्याला मिळालेली एक विशेष संधी आहे यासाठी आपण राष्ट्राचे ऋणी आहोत या वृत्तीने विद्यार्थ्याने पाहिले पाहिजे व स्वतः च्या ज्ञानाचा समाजाला व देशाला उपयोग करुन दिला पाहिजे.

**म. गांधीजी यांची मुलोद्योगी शिक्षण योजना (Basic Education):**

म. गांधी यांनी १९३७ साली वर्धा येथे केलेले भाषण व हरिजन या पत्रिकेतून आपल्या मुलोद्योगी शिक्षण या योजनेचे स्वरूप स्पष्ट केले आहे ते म्हणजे.

१. सात ते चौदा वर्ष वयापर्यंतच्या मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत असावे.
२. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी.
३. शिक्षण आपल्या तर्फे एखाद्या उत्पादक उद्योगाच्याद्वारे देण्यात यावे.
४. शिक्षण स्वश्रमी असावे. म्हणजे निवडलेल्या उत्पादक उद्योगातून शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सुटावा.

भारतातील बहुसंख्य दरिद्री गरीब जनता लक्षात घेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आधारित अशी ही मुलोद्योगी शिक्षणाची योजना म. गांधी यांनी बनवली होती ती योजना आजही प्रासंगिक असल्याचे दिसून येते.

**गांधीजीच्या शिक्षणविषयक नवकल्पना / नई तालिमः-**

भारतात शिक्षण हे अधिकाधिक लोकाभिमुख होऊन त्याचा अधिक प्रसार व्हावा व शिक्षणाद्वारे व्यवसायाचे ज्ञान प्राप्त व्हावे या दृष्टीने गांधींनी साबरमती सेवाग्राम आश्रमात बरेच प्रयोग केले. मुलोद्योगी शिक्षण हा भारतातील शिक्षण क्षेत्रातील मुख्य प्रयोग होता. पुस्तकी शिक्षणाद्वारे शिकवल्या जाणाऱ्या ठराविक साच्याचा अभ्यासक्रम जीवनात काही विशेष साध्य करु शकत नाही. अभ्यासक्रमातून जीवनाला पवित्र दिशा मिळाली पाहिजे. म्हणून त्यांनी आपल्या मुलोद्योगी शिक्षण अभ्यासक्रमाला नई तालिम किंवा जीवनशिक्षण हा शब्द वापरला. जीवनाच्या गरजांना प्राध्यान्य देऊन अभ्यासक्रम आखले जावेत असे त्यांना वाटत होते. चांगल्या अभ्यासक्रमाच्या निकषात १. जीवनाभिमुखत २. कृतीपरता ३. समवायता याचा अंतर्भाव आवश्यक असावा असे त्यांचे मत होते.

**साराश,**

ब्रिटीशांनी भारतात घालवून दिलेला शिक्षणाचा पाठ मोडीत काढत म. गांधींनी त्याकाळी आपल्या शिक्षणविषयक विचारातून शिक्षण क्षेत्राला एक नवीन ध्येयदृष्टी दिली असून त्यासाठी अभ्यासक्रमाचा नवोदित दृष्टीकोण, शिक्षणाचे माध्यम, अध्यायन-अध्यापन पध्दती, नैतिक व्यावसायिक शिक्षण, प्रोढ शिक्षण, स्त्री शिक्षण, अरोग्य शिक्षण, कला शिक्षण याचा आग्रह धरलेला दिसतो. शिक्षण व शिक्षण व्यवस्थेविषयी अशा नवनोन्मेषी संकल्पना मांडताना त्यांनी त्यातील स्वालंबन आणि आत्मनिर्भरतेबरोबरच नैतिकता व पावित्र्याला सुध्दा विशेष महत्व दिलेले आहे. गांधीजींचे ८० वर्षाखालील शिक्षणविषयक हे विचार आजही किती प्रासंगिक आणि समयोचित आहेत हे वर्तमानकालीन सरकारच्या शिक्षणविषयक नव्या योजनांकडे पाहिल्यानंतर लक्षात येते. सांप्रत सरकारने सुरु केलेल्या कौशल्य आधारित शिक्षण योजनांचे (Skill India, Start Up India) मुळाधार आशय म. गांधीजीच्या विचारात दिसून येते.

संदर्भः-


१. गांधी मो. क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, (२००६) नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
२. गांधी मो. क., रचनात्मक कार्यक्रम (२०१०) नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
३. गांधी मो. क., हिंद स्वराज्य, नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
४. गांधी मो. क., माझ्या स्वप्नातील भारत, (२०१०) परधाम प्रकाशन वर्धा.
५. माशेलकर रघुनाथ (संपा.) अखंड प्रेरणा गांधी विचारांची,
६. कुंभार नागाराव (संपादित) म. गांधी विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन लातूर.
७. हरिजन पत्रिका, ११ सप्टेंबर १९३७ .